MHBI080015722022

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | ०४/१०/२०२२ |
| नोंदणी तारीख | : | ०७/१०/२०२२ |
| निकाल तारीख | : | ११/१०/२०२२ |
| कालावधी | : | वर्षे ०० महिने ०० दिवस ०८ |

## दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, माजलगाव यांचे न्यायालयात
## (पीठासीन अधिकारी – एस.डी.घनवट )

**हिंदू विवाह अर्ज क्र. ११६/२०२२**
**निशाणी क्र. १६/अ**

**अ**

**अर्जदार क्र. १**

**आणि**

**ब**

**अर्जदार क्र. २**

अर्ज : – <u>हिंदू विवाह अधिनियम १९५५ चे कलम– १३(ब) प्रमाणे परस्पर संमतीने घटस्फोट मिळणेकरीता</u>.

---

अर्जदार क्र. १ व २ तर्फे विद्वान वकील – श्री. आर. के. गवते

---

## न्यायनिर्णय
## (घोषित दिनांक ११/१०/२०२२)

अर्जदारांचे थोडक्यात असे कथन आहे की, अर्जदार क्र. १ व अर्जदार क्र. २ यांचा विवाह दिनांक २९.०७.२०२० रोजी हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे व जातीरिवाजानुसार संपन्न झाला आहे. अर्जदार क्र. १ व २ हे लग्नानंतर एकत्र राहत असताना त्यांच्यामध्ये स्वभाव भिन्नतेमुळे भांडणे होवू लागली. सदरचे लग्नसंबंधातून त्यांना कोणतेही अपत्य झालेले नाही. अर्जदार क्र. १ व २ हे ३०.०१.२०२१ पासून विभक्त रहात आहेत व त्यावेळेपासून त्यांच्यात कोणताही वैवाहिक अथवा पती–पत्नी म्हणून संबंध आलेला नाही. अर्जदारांमध्ये आपसात समझोता होण्यासाठी नातेवाईक व गावातील लोकांनी प्रयत्न केले परंतु त्यास यश आले नाही. भविष्यात त्यांचे एकमेकांशी अजिबात पटणार नाही अशी उभयतांची मनोमन खात्री पटली आहे. अर्जदार क्र.१ व २ यांच्यात खालील अटी व शर्तीवर संमतीने घटस्फोट घेणेचे ठरले आहे. अर्जदार क्र.२ हीने अर्जदार क्र.१ चे लाभात तिचा कायमचे पोटगीचा हक्क सोडून दिलेला आहे. तसेच, अर्जदार क्र.२ ही अर्जदार क्र.१ च्या स्थावर व जंगम मालमत्तेमध्ये हिस्सा मागणार नाही. अर्जदार क्र. १ व २ यांचे एकमेकांकडे काहीही येणे बाकी राहिलेले नाही व ते भविष्यात एकमेकांच्या स्थावर व जंगम मिळकतीमध्ये हक्क सांगणार नाहीत. सदरच्या तडजोडीनुसार आता उभयतांनी पूर्ण विचारांती एकमेकांच्या संमतीने घटस्फोट घेण्याचे ठरविले आहे.

२. अर्जातील कथनावरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले असून त्याचे कारणांसह मी खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे.

| **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. अर्जदार हे हिंदू विवाह अधिनियम १९५५ चे कलम– १३(ब) प्रमाणे घटस्फोटाची दाद मिळण्यास हक्कदार आहेत काय ? | ... | होय |
| २. आदेश काय ? | ... | अंतीम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

## मुद्दा क्र. १ व २ बाबत

३. अर्जदारांनी त्यांच्या पुराव्याच्या पुष्ट्यर्थ अनुक्रमे निशाणी क्र. १३ व १४ वर सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील पूर्ण मजकूर समाविष्ट केला आहे. त्यामध्ये त्यांनी कथन केले आहे की त्यांच्यामध्ये स्वभाव भिन्नतेमुळे भांडणे होवू लागली व सदरचे वाद विकोपाला गेले आहेत आणि आता भविष्यात त्यांचे एकमेकांशी अजिबात पटणार नाही अशी उभयतांची मनोमन खात्री पटलेली आहे. त्यामुळे त्यांनी संमतीने घटस्फोट घेण्याचे ठरविलेले आहे. अर्जदार क्र. १ व २ यांच्यातील तडजोडीच्या अटी व शर्तींची पुर्तता झाल्याचे दिसून येते. त्यामुळे वरील विवेचनाच्या आधारावर मी या निष्कर्षास आलो आहे की, अर्जदार हे संमतीने घटस्फोट मिळण्यास हक्कदार आहेत. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवित असून मुद्दा क्र.२ च्या उत्तरासाठी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदार क्र. १ व अर्जदार क्र. २
यांच्यामधील दिनांक २९.०७.२०२० रोजीचा विवाह घटस्फोटाने संपुष्ट करण्यात येत आहे.

२. खर्चाबद्दल आदेश नाही.

३. नियमाप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

४. निकालाची प्रत पक्षकारांना मोफत देण्यात यावी.

SOPAN D GHANWAT
Digitally signed by SOPAN D GHANWAT
Date: 2022.10.11 17:38:38 +0530

दिनांक – ११/१०/२०२२ (एस. डी. घनवट)

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, माजलगाव

**हिंदू विवाह अर्ज क्र. ११६/२०२२**

**निशाणी क्र. १६/अ**

**शेरा**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | श्री. हनुमंत बळवंतराव सूर्यवंशी |
| कोर्टाचे नाव | – | दि. न्या. व. स्तर, माजलगाव |
| न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दिनांक | – | ११/१०/२०२२ |
| न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दिनांक | – | ११/१०/२०२२ |
| न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दिनांक | – | ११/१०/२०२२ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | – | ११/१०/२०२२ |

स्वाक्षरीत/–

दिनांक – ११/१०/२०२२

(ह. ब. सूर्यवंशी)

लघुलेखक ग्रेड – २,

दिवाणी न्यायालय, व. स्तर, माजलगाव